## नियमित दिवाणी दावा २०/२०२२ मधील नि.क्र.०८ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज सि.पी.सी. ऑ.६ रुल १७ प्रमाणे दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप, निरंतर ताकीदीसाठी व जाहीर होऊन मिळण्यासाठी वगैरेचा दावा दाखल केला आहे. तसेच सदरचा दावा दाखल केलेनंतर सदर दावा अर्जाच्या सरनाम्यामध्ये प्रतिवादी नं. ७ यांचे नांव दुर्योधन नामदेव यमगर असे झाले असुन त्याचे नांव दुर्योधन नामदेव व्हनमाने असे आहे.

२. वादीने मागितलेली वरील दुरुस्ती ही अतिशय फॉर्मल स्वरुपाची आहे. अशी दुरुस्ती मंजुर झालेस वादीचे दावा अर्जामधील कथनामध्ये व वादीचे दाव्याचे नेचरमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. दाव्याचे स्वरुपही बदलणार नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती ही केवळ प्रतिवादी क्र. ७ चे नावाची आहे. अशा दुरुस्तीने वादीचे दाव्यात अंतिम न्यायदानास मदत होणार आहे. अशी वादीने मागितलेली दुरुस्ती मंजुर झालेस प्रतिवादीचे अथवा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. उलट वादीने मागितलेली दुरुस्ती नामंजुर झालेस वादींचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होऊन पुढे गुंतागुंत वाढणार आहे. तसेच त्यांना त्यांच्या दावा मिळकतीतील हक्कांना मुकावे लागणार आहे. तरी सदर दावा अर्जाच्या सरनाम्यामध्ये प्रतिवादी क्र. ७ चे नाव दुर्योधन नामदेव व्हनमाने असे नमुद करणेची विनंती केली.

३. दाव्याचे अवलोकन केले असता वादींनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाटप, निरंतर ताकीदीसाठी व जाहीर होऊन मिळण्यासाठी वगैरेचा दावा दाखल केला आहे. वादीच्या सदर अर्जाचे अवलोकन केले असता सदर दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची

असुन सदर दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करावी.

३. संबंधित कारकून यांनी सदर दुरुस्तीची नोंद दावा नोंदणी रजिस्टरमध्ये व संगणकीय प्रणालीमध्ये दुरुस्ती करुन घ्यावी.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

५. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2022.06.17 17:40:49 +0530

आटपाडी. **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक– १७/०६/२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 17.06.2022
Order signed by the
Presiding Officer on - 17.06.2022
Order uploaded on - 17.06.2022